खोरे समरुपण विभाग, पुणे या विभागाच्या तांत्रिक व प्रशासकीय बाबींच्या नियंत्रणात बदल करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक:- आढावा-२०१९/प्र.क्र. ६६/२०१९/आस्था.(पुनर्रचना)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- ०७ सप्टेंबर, २०१९

<u>वाचा</u>:- १) वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक :टिआरडब्ल्यू-१०८३/सीआर-६११/८३/एडीएम-९, दि.८/३/१९८४
२) पाटबंधारे विभाग, शासन निर्णय, क्रमांक :आढावा १००२/(३३५/०२)/आ(प्रशि), दि.०६.०२.२००३
३) जलसंपदा विभाग, शासन निर्णय, क्रमांक : जविप्र-२००७/(२९३/०७)/जसंनि, दि. १२.१२.२००७

<u>प्रस्तावना :-</u>

सन २००५ व २००६ यावर्षी राज्यात उद्भवलेल्या पूर परिस्थितीमुळे आपत्कालीन परिस्थितीत धरणातून सोडावयाच्या विसर्गाचे अचूक निदान व पूराचे नियोजन करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यासाठी मुख्य अभियंता, जलविज्ञान प्रकल्प, नाशिक अधिनस्त अधीक्षक अभियंता, आधार सामग्री पृथ:करण मंडळ, नाशिक अंतर्गत संदर्भाधीन क्र. २ च्या शासन निर्णयान्वये खोरे समरुपण विभाग, पुणे कार्यान्वित करण्यात आला आहे. सदर समरुपण विभाग हा RTDAS, RTSF & ROS (Flood Forecasting Model) प्रणालीची Real Time Data नुसार प्रत्यक्ष व अंदाजीत पर्जन्यमान, येवा, विसर्ग, पूर इ. बाबत तुलनात्मक अभ्यास करून कृष्णा व भीमा खोऱ्यातील संबंधित अधीक्षक अभियंतांना व मुख्य अभियंतांना माहिती पुरवित असून त्याचा वापर पूर परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी उपयुक्त आहे. कृष्णा व भिमा खोऱ्यांमध्ये उभारण्यात आलेल्या आधार सामग्री संकलन प्रणाली (Real Time Data Acquisition system-RTDAS) व एककालिक नदी प्रवाह व धरण प्रचालन प्रणाली (Real Time System Flow & Reservoir Operation System-RTSF & ROS) मॉडेलचा कार्यक्षम वापर होण्यासाठी मुख्य अभियंता, जलविज्ञान प्रकल्प, नाशिक यांच्या अधिनस्त आधार सामग्री पृथ:करण मंडळ, नाशिक अंतर्गत असलेले खोरे समरुपण विभाग, पुणे या विभागाचे राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प (NHP) अंतर्गत करावयाच्या कामांबाबत तांत्रिक बाबींचे नियंत्रण मुख्य अभियंता, जलविज्ञान प्रकल्प, नाशिक यांच्याकडे व वार्षिक पूरनियंत्रण व प्रशासकीय बाबींचे नियंत्रण मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे यांच्याकडे वर्ग करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार, खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय -:</u>

कृष्णा व भिमा खोऱ्यांमध्ये उभारण्यात आलेल्या आधार सामग्री संकलन प्रणाली (Real Time Data Acquisition system-RTDAS) व एककालिक नदी प्रवाह व धरण प्रचालन प्रणाली (Real Time System Flow & Reservoir Operation System-RTSF & ROS) मॉडेलचा कार्यक्षम वापर होण्यासाठी आधार सामग्री पृथ:करण मंडळ, नाशिक अंतर्गत असलेले खोरे समरुपण विभाग, पुणे या विभागीय कार्यालयाचे वार्षिक पूरनियंत्रण व प्रशासकीय बाबींचे नियंत्रण मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे यांच्याकडे वर्ग करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर विभाग हा मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे या प्रादेशिक कार्यालयात थेट मुख्य अभियंता यांच्या अधिपत्याखाली कार्यान्वित राहील.

खोरे समरुपण विभाग, पुणे या विभागीय कार्यालयाच्या प्रशासकिय व तांत्रिक नियंत्रणात बदल करण्यात आला असून, सदर विभागाच्या मंजूर आस्थापनेत व कार्यालयीन जागेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

३. तथापि, राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प (NHP) अंतर्गत नव्याने करावयाच्या कामांसाठी जलविज्ञानाच्या तांत्रिक बाबींचे नियंत्रण मुख्य अभियंता, जलविज्ञान प्रकल्प, नाशिक यांच्याकडे राहील.

४. खोरे समरुपण विभाग, पुणे या विभागीय कार्यालयाच्या प्रशासकीय व तांत्रिक नियंत्रणात बदल होत असल्याने, या कार्यालयासाठी वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.टिआरडब्ल्यू-१०८३/ सीआर-६११/८३/एडीएम-९, दि.८/३/१९८४ मधील तरतूदीनुसार मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे या प्रादेशिक कार्यालयातील नियंत्रक अधिकारी व आहरण व संवितरण अधिकारी यांना सदर विभागाचे नियंत्रक अधिकारी व आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. उपरोक्त प्रमाणे नियंत्रणातील होणाऱ्या बदलाबाबतची आवश्यक ती सर्व कार्यवाही संबंधित कार्यालयांनी करावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०९०७१६४९५८६३२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sunil Gangaram Gangarkar

Digitally signed by Sunil Gangaram Gangarkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8b2512fdfec4104829bc2f439e33adb2e3f823a285cfade8149e690564bc13f6, cn=Sunil Gangaram Gangarkar
Date: 2019.09.07 16:55:48 +05'30'

(सु. गं. गांगरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव
४. मा. मंत्री (खारभूमी) यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक
६. मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद/विधानसभा
७. मा.विधानपरिषद/विधानसभा सदस्य (सर्व)
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (ज.सं.प्र. व विकास), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.सचिव (ज.सं.व्य. व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
११.सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/ नागपूर
१३.महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा) मुंबई/ नागपूर
१४.संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१५.महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षा (DTHRS) मेरी, नाशिक.
१६.सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग.
१७.सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक.
१९.मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे.
२०.सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
२१.उप सचिव (सेवा)/ उप सचिव (आस्था)/उप सचिव (प्रशा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२.आंतर वित्तीय सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३.अधीक्षक अभियंता, आधार सामग्री पृथ:करण मंडळ, नाशिक.
२४.सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
२५.कार्यकारी अभियंता, खोरे समरुपण विभाग, पुणे.
२६.कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे.
(कार्यालयाच्या नियंत्रणात होणाऱ्या बदलांची नोंद घेण्यास्तव अग्रेषित)
२७. सर्व अधिकारी व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
२८. कार्यासन आस्थापना (पुनर्रचना) संग्रहार्थ.